जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - १३६०** **दिनांक २०/११/२०२०**

**दत्तवाडी पो. स्टे. पुणे शहर**

**दहशत निर्माण करण्यासाठी पिस्टल बाळगणा-या सराईताला दत्तवाडी पोलीसांनी केले जेरबंद.**

मा.पोलीस उप-आयुक्त सो़ परीमंडळ-०३ पुणे यांचे आदेशानुसार हद्दीतील गंभीर गुन्हयांना प्रतीबंध करणेचे अनुषंगाने दत्तवाडी पोलीस ठाणे हद्दीत तपास पथक पेट्रोलिंग करीत असताना दि.१९/११/२०२० रोजी सायकांळी १७/०० वा. चे सुमारास तपास पथकातील पोलीस हवालदार कुंदन शिंदे व पोलीस अंमलदार विष्णु सुतार यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,एक इसम हा देशी बनावटीचे पिस्टल घेवुन नवरत्न हॉटेल शेजारील बोळात मोकळया जागेत, पुणे सातारा रोड पुणे येथे एकटाच कोणाची तरी वाट बघत थांबला आहे.सदरची बातमी लगेचच तपास पथकाचे प्रभारी श्री स्वप्नील लोहार यांना कळवली असता,त्यांनी ती मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राम राजमाने सो यांना कळवुन त्यांचे आदेशाने तपास पथकातील स्टाफसह पुणे सातारा रोड येथील नवरत्न हॉटेल येथे त्याला १८/४५ वा. जागीच पकडले. तेव्हा त्याने त्याचे नाव बापु ऊर्फ परशुराम अरुण जानराव, वय-४१ वर्षे,रा.२७६३९/२३,अप्पर ओटा गॅस गोडावन जवळ,अप्पर,पुणे असे सांगितले. त्यावेळी त्याची झडती घेता त्याचे कमरेला डावे बाजुस आतमध्ये एक देशी बनावटीचे पिस्टल खोचलेले असल्याचे मिळुन आले व त्याचे पॅन्टचे डावे खिशात दोन जिवंत काडतुसे मिळून आले. त्याचेकडे अधिक चौकशी करताना त्याने सदरची पिस्टल वारजे माळवाडी पुणे येथुन मोका मधुन सुटलेल्या त्याच्या सख्या मेव्हुण्याकडुन घेतल्याचे सांगितले.

आरोपी नामे बापु जानराव याचेवर सहकारनगर, बिबवेवाडी या पोलीस ठाणे अतंर्गत खुनाचा प्रयत्नाचे तीन,तोडफोड,जाळपोळ,दारु विक्री असे १० पेक्षा जास्त गुन्हे दाखल आहेत. तसेच त्याच्या मेव्हुण्यावर शिवाजीनगर, वारजे पोलीस ठाण्यात तोडफोड व मारामारीचे गुन्हे दाखल असुन त्याचेवर यापुर्वी मोका अतंर्गत कारवाई झालेली आहे.

सदरची कारवाई ही मा.पौर्णिमा गायकवाड, मा.पोलीस उप-आयुक्त सो परि-२ पुणे शहर, मा. पोमाजी राठोड, सहा. पोलीस आयुक्त,सिंहगड विभाग पुणे शहर व मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक, राम राजमाने सो, पोलीस निरीक्षक,(गुन्हे) विजय खोमणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक, स्वप्नील लोहार, पो.हवा.कुंदन शिंदे, पो.हवा.सुधीर घोटकुले, अंमलदार महेश गाढवे, राहुल ओलेकर, शिवाजी क्षीरसागर, अमित सुर्वे, विष्णु सुतार, अक्षय कुमार वाबळे, नवनाथ भोसले, सागर सुतकर, शरद राऊत यांनी केली आहे. तसेच दाखल गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार सुधीर घोटकुले हे करीत आहेत.

(राम राजमाने)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पो.स्टे.पुणे शहर